सकाळ

# चार उद्योगाभिमुख शिक्षणक्रमांची घोषणा

## कौशल्ये व शैक्षणिक अभ्यासक्रमातील अंतर भरून काढण्यासाठी उपयुक्त

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २० : के. के. वाघ संस्था संचालित स्वायत्त दर्जा प्राप्त अभियांत्रिकी व संशोधन संस्थेने यंदापासून चार नवीन उद्योगाभिमुख शिक्षणक्रमांची घोषणा केली आहे. त्यात रोबोटिक ॲटोमेशन, हिटिंग, व्हेंटिलेशन ॲन्ड एयर कंडिशनिंग (एचव्हीएसी), कॉन्टम अभियांत्रिकी, इंडस्ट्रिअल ऑटोमेशन यांचा समावेश आहे.

डॉ. उदय वाड, जयंत कुलकर्णी, सुरेश दीडमिशे आणि अनिल आहेर या चार तज्ज्ञ अभियंत्यांनी शिक्षणक्रमाचे औद्योगिक क्षेत्रासाठीचे महत्त्व विशद केले. या वेळी अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्रा. डॉ. रत्नाकर पवार, प्रा. डॉ. प्रशांत कुशारे, प्रा. डॉ. रवींद्र मुंजे आदी मान्यवर उपस्थित होते.

विख्यात उद्योजक, या अभ्यासक्रमाच्या आखणीत सहभागी नीलेश साळगावकर यांनी औद्योगिक क्षेत्रात लागणारे ज्ञान, कौशल्ये व शैक्षणिक अभ्यासक्रम यातील अंतर भरून काढण्यासाठी हे शिक्षणक्रम उपयुक्त ठरतील, असे सांगितले.

'रोबोटिक्स ॲन्ड ऑटोमेशन'' विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्माकर पवार म्हणाले, की उत्पादन क्षेत्राच्या सर्व विभागांमध्ये 'लीन मॅनेजमेंट'चा वापर वाढला आहे. हे ज्ञान प्राप्त विद्यार्थ्यांची औद्योगिक क्षेत्रात मोठी मागणी असून, ती भविष्यात वाढत जाणार आहे.

'एचव्हीएसी' शिक्षणक्रमाने विद्यार्थ्यांना चांगल्या नोकरीसह नवीन उद्योग सुरू करण्याचीही संधी प्रदान करते, असे प्रा. डॉ. प्रशांत कुशारे यांनी सांगितले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रवींद्र मुंजे यांनी, 'इंडस्ट्रिअल ऑटोमेशन' पदवीप्राप्त विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक सर्किट्सचे स्वहस्ते निर्माण करू शिकतील, असे सांगितले.

प्रा. डॉ. स्नेहल कमलापूर यांनी, क्वांटम कॉम्प्युटिंग पारंपरिक संगणकांपेक्षा लाखपटींनी वेगवान असून, पुढील पिढीच्या तांत्रिक क्रांतीचा तो मजबूत पाया ठरणार आहे. हे तंत्रज्ञान अत्यंत गुंतागुंतीच्या समस्या काही सेकंदांत सोडविण्याची क्षमता प्रदान करेल. एआय, सायबर सुरक्षा यांसारख्या क्षेत्रांना नवे आयाम प्रदान करेल. जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी आभार मानले.

### मोजक्या महाविद्यालयात 'वाघ अभियांत्रिकी'

**औद्योगिक क्षेत्रातील मोठा अनुभव असलेल्या तज्ज्ञ अभियंत्यांनी हा अभ्यासक्रम तयार केला असून, तज्ज्ञ स्वतः हे विषय शिकवणार आहेत, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली. नवीन शिक्षण धोरणात अभिप्रेत 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' या पदावर अशा तज्ज्ञ लोकांची नेमणूक करणाऱ्या देशातील मोजक्या महाविद्यालयांपैकी वाघ अभियांत्रिकी एक महाविद्यालय असल्याचे डॉ. नांदुरकर यांनी सांगितले.**